सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

**क्र. १७]  शनिवार दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ : भाद्रपद ३०, शके १९४१  [किंमत ०.०० रु.]**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत**


# भाग एक-अ औरंगाबाद विभाग

**१**

**जिल्हाधिकारी परभणी यांजकडून**

**वाचा :** पोलीस अधिक्षक, परभणी यांचे कार्यालयाचे पत्र क्र.३२२६/जिविशा/नौरात्रोत्सव/२०१९, दि. १६/०९/२०१९.

क्र.बीपीए-११२०१९/बंद/का.अ.- ज्याअर्थी परभणी जिल्ह्यात दि. २९/०९/२०१९ रोजी नवरात्र उत्सवाची सुरुवात घटस्थापनेने होत असून दि. ०८/१०/२०१९ रोजी दसरा (विजयादशमी) व दुर्गादेवीचे विसर्जन होणार आहे. त्याअर्थी सदर उत्सवाच्या काळात जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी आणि जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवून अनुचित प्रकार घडू नये या करीता मुंबई मद्य निषेध कायदा, १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी जिल्हाधिकारी परभणी असे आदेश देतो की, परभणी जिल्ह्यातील सर्व मद्यविक्रीच्या अनुज्ञप्त्या सीएल-३ (देशी दारु किरकोळ विक्री अनुज्ञप्ती), एफएल-२ (सीएल/एफएल/टिओडी-३) (देशी/विदेशी दारु किरकोळ विक्री अनुज्ञप्ती), एफएल-३ (परवाना कक्ष, व एफएल/बीआर-२ (बीअरची सिलबंद बाटलीतून विक्री) दि. २९/०९/२०१९ रोजी घटस्थापना व दि. ०८/१०/२०१९ रोजी दसरा सणा निमित्ताने मद्य विक्रीसाठी संपूर्णतः बंद ठेवण्याचे आदेश देत आहे.

या आदेशाचा भंग करणाऱ्या अनुज्ञप्तीधारका विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०९/२०१९

ठिकाण : परभणी.

**पी. शिव शंकर,**
जिल्हाधिकारी, परभणी.




ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.